# प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर

**प्लॉट नंबर -२, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोसायटी,**
**आर्कीटेक्ट कॉलेजच्या पाठीमागे, कुमठा नाका परिसर, सोलापूर**
**दुरध्वनी क्रमांक ०२१७ २६०७६००**
**E Mail : poitdp.solapur-mh@gov.in**


---

कंत्राटी क्रिडा शिक्षक/क्रिडा मार्गदर्शक निवड समिती, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर

## कंत्राटी क्रिडा शिक्षक/ क्रीडा मार्गदर्शक ११ महिन्यांच्या कराराने नियुक्तीसाठी जाहिरात सन २०१८-१९

(जाहिरात क्रमांक १/२०१८)

**सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना https://solapur.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग शा. नि. क्र- शाआशा-२०१८/प्र.क्र.८४/का.१३, दिनांक ६ मार्च २०१८ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर, यांचे अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रमशाळांसाठी पुढील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने (रुपये २५,०००/- इतक्या एकत्रित वेतनावर ) क्रिडा शिक्षक / क्रिडा मार्गदर्शक नियुक्त करण्यासाठी अर्हताधारक पात्र उमेदवारांकडून दिनांक ११ जून २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून ते अंतिम मुदत दिनांक २१ जून २०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयास पोहचतील अशा पध्दतीने रजिस्टर पोस्टाने / स्पीड पोस्टाने सोबतच्या नमुन्याप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहेत. दिनांक २१ जुन २०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या अंतिम मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर अंतर्गत कंत्राटी पद्धतीने भरावयाचे कंत्राटी क्रिडा शिक्षक / क्रिडा मार्गदर्शक व संख्या**

| अ.क्र. | पदाचे नांव | नियुक्तीचे ठिकाण | संख्या |
|---|---|---|---|
| १. | कंत्राटी क्रिडा शिक्षक / क्रिडा मार्गदर्शक | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, होटगी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | ०१ |
| २. | | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सवतगव्हाण, ता. माळशिरस, जि. सोलापूर | ०१ |
| | | **एकूण** | ०२ |

**शैक्षणिक अर्हता (अर्ज करते वेळी उमेदवाराने सदर अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.)**

| अ.क्र. | पदाचे नांव व वेतन | आवश्यक शैक्षणिक पात्रता | | मुलाखतीचे ठिकाण | मुलाखतीची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | कंत्राटी क्रिडा शिक्षक / क्रिडा मार्गदर्शक<br><br>११ महिन्याचा कंत्राटी पध्दतीवर<br><br>एकत्रित वेतन रु. २५०००/- (अक्षरी रुपये - पंचवीस हजार मात्र) | **सर्वसाधारण उमेदवारांसाठी** (माजी सैनिक, स्वेच्छा सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचे व्यतिरिक्त असलेल्या उमेदवारांसाठी) | उमेदवार **क्रिडा विषयाचा पदवीधर** असावा. (एन.आय.एस./बी.पी.एड./बी.एड.- शारिरिक शिक्षण) तसेच किमान विदयापीठ स्तरावर कोणत्याही खेळाचे प्रतिनिधीत्व केलेला असावा. | जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | * ३० जुन २०१८<br><br>सकाळी ११.०० वाजता |
| | | **माजी सैनिक, स्वेच्छा सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचेसाठी** | उमेदवार हा **कोणत्याही विषयाचा पदवीधर** तथा किमान विद्यापीठ स्तरावर कोणत्याही खेळाचे प्रतिनिधीत्व केलेले असावा. | | |

**स्पष्टीकरण**

१. सदर पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणीक व इतर अनुषंगीक पात्रता धारण केली असेल अशाच उमेदवारांच्या अर्जांचा विचार केला जाईल. आवश्यक पात्रता पुर्ण न करणा-या उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

२. सोलापूर जिल्हयाचा विचार करता कंत्राटी पध्दतीने सोलापूर जिल्हयातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत नियुक्तीचे ठिकाणे दोन असल्याने निवड करताना १) नामवंत खेळाडू, २) माजी सैनिक, ३) स्वेच्छा सेवानिवृत्त पोलीस अधिकारी,४) विशेष क्रीडा अर्हता, ५) किमान विदयापीठ स्तरावर मैदानी खेळाचे प्रतिनिधीत्व

केलेले या बाबीबद्दल अर्जा सोबत जोडलेले पुरावे व कागदपत्रे छाननी करुन मुलाखतीसाठी बोलविण्याचा निर्णय शासकीय आश्रमशाळांसाठी क्रिडा शिक्षकाची / क्रिडा मार्गदर्शकाची निवड करण्यासाठी गठीत केलेली जिल्हा निवड समिती करेल.

३. *नमुद केलेल्या मुलाखतीचा दिनांक व वेळ अंदाजित असून अपरिहार्य कारणास्तव अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा शासन आदेशाने विहीत दिनांकास मुलाखती घेणे शक्य नसेल तर निवड समिती ठरवून देईल त्याप्रमाणे सोईनुसार मुलाखती घेणेत येईल याबाबत वृत्तपत्राद्वारे / कार्यालयाच्या माहिती फलकाद्वारे कळविणेत येईल.

४. प्राप्त अर्जदारांनमधून शैक्षणिक व क्रिडा नैपुण्य गुणवत्तेनुसार निवडक उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांना दूरध्वनीद्वारे / भ्रणध्वनीद्वारे/ रजिस्टर पोस्टाने मुलाखतीसाठी बोलावले जाईल. यास्तव उमेदवारांनी आपला दुरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमाक / पत्ता पिनकोडसह बिनचूक नमूद करावा.

५. मुलाखतीसाठी पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, कागदपत्रे तपासणी/छाननी, व या संबंधीत सुचना कार्यालयाच्या माहिती पटलावर दिनांक २५/०६/२०१८ रोजी उपलब्ध करण्यात येतील.

६. निवड करण्यात आलेल्या उमेदवाराची क्रिडा प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाकडे तपासणीसाठी पाठविणेत येवून सदर प्रमाणपत्र वैध ठरल्यानंतरच सदर उमेदवारांना नेमणूक देण्यात येईल.

७. उमेदवार हा महाराष्ट्रातील राहिवासी असावा. अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

८. क्रिडा शिक्षक/क्रिडा मार्गदर्शक निवडीकरिता उमेदवार शारिरीकदृष्टया तंदुरुस्त असणे व किमान विद्यापीठ स्तरावर कोणत्याही मैदानी खेळाचे प्रतिनिधीत्व केलेले असणे गरजेचे आहे.

९. उमेदवारांनी अर्जात माहिती भरतांना मूळ कागदपत्रावरुन बिनचुक माहिती भरावी. अर्जात भरलेली माहितीच्या आधारे मुलाखतीमध्ये प्राप्त गुणानुक्रमानुसार नियुक्तीस पात्र उमेदवारांनी त्यांचे मुळ शैक्षणिक व इतर कागदपत्र पडताळणी करणे करीता अंतरीम स्वरुपात यादी प्रसिध्द करण्यांत येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती, व मुळ कागदपत्राच्या तपासणीनंतर परिपुर्ण सिध्द होईल, अशा उमेदवारांचीच निवड करण्यात येईल. मुळ कागदपत्र पडताळणी करतेवेळी सदर कागदपत्रांमध्ये खोटी प्रमाणपत्र/असत्य अथवा चुकीची प्रमाणपत्र आढळल्यास त्यांच्याविरुध्द् भा.द.वि नुसार फौजदारी गुन्हा नोंदवून कारवाई करण्यांत येईल.

## वयोमर्यादा :-

**सर्वसाधारण उमेदवाराकरिता** - दिनांक ०१/०६/२०१८ रोजी उमेदवारांचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**माजी सैनिक, स्वेच्छा सेवानिवृत्त पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता** वयोमर्यादा शिथिलक्षम करणेचे अधिकार जिल्हा निवड समितीकडे आहेत.

## अटी व शर्ती.

१. सदर नेमणुक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल.
२. या नियुक्त उमेदवारास शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.
३. सदर नेमणुक ही करार पध्दतीने अकरा महिन्यांसाठी करण्यात येईल.
४. उमेदवारांची निवड झाल्यानंतर रु. १००/- च्या बंधपत्रावर आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र शाआशा-२०१८/प्र.क्र.८४/का१३,दिनांक ०६ मार्च २०१८ मधील विवरण पत्र -अ प्रमाणे करारनामा करणे बंधनकारक असेल.
५. शासकीय आश्रमशाळांसाठी क्रिडा शिक्षक /क्रिडा मार्गदर्शकाची नियुक्ती करतांना हे नियुक्ती नियमित करण्याची अथवा समायोजन करण्याची कोणतीही मागणी/विनंती मान्य केली जाणार नाही.
६. क्रिडा मार्गदर्शकास आश्रमशाळेत पूर्णवेळ निवासी राहून संबंधित मुख्याध्यापक तथा प्रकल्प अधिकारी यांनी दिलेल्या सूचनेनप्रमाणे कर्तव्य पार पाडावे लागेल त्याला अन्य नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही.

## अर्ज करण्याची पध्दत व सूचना :-

१. **केवळ रजिस्टर पोस्टाने / स्पीड पोस्टाने दिनांक ११ जून २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून ते अंतिम मुदत दिनांक २१ जून २०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** या कार्यालयास प्राप्त होणा-या अर्जाचाच विचार करण्यात येईल. रजिस्टर /स्पीड पोस्टाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही मार्गाने पाठविलेले अर्ज तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

२. उमेदवारांचे अर्जासोबत शैक्षणिक व अन्य प्रमाणपत्रांच्या सांक्षाकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

३. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करणे, भरती प्रक्रिया रद्य करणे, पदांच्या एकुण संख्येमध्ये वाढ किंवा घट करणे, प्राप्त पात्र अर्जदारांनपैकी उच्चतम गुणवत्तेच्या गुणानुक्रमानुसार मुलाखतीच्या प्रक्रियेसाठी पात्र ठरणा-या सर्व अथवा निवडक उमेदवारांस मुलाखतीस बोलाविणे याबाबतचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड

समिती तथा जिल्हाधिकारी, सोलापूर हे स्वत:कडे राखून ठेवत आहेत. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

४. सेवायोजन कार्यालय, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा सैनिक कल्याण बोर्ड यांचेकडून शिफारस होणा-या उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक व अन्य पात्रतांनूसार विहीत नमुन्यात व विहीत मुदतीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे

५. माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केल्या बाबतचे आवश्यक कागदपत्र व जिल्हा सैनिक बोर्डात नांवनोंदणी केले असल्याबाबत प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेख / प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. तसेच निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्राची सक्षम अधिका-यांकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यांत येणार नाही.

६. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी ते पुर्वी पोलीस दलात सेवारत असल्याबाबतचा पुरावा सादर करावा. सदर कागदपत्रांची सक्षम अधिका-यांकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यांत येणार नाही.

७. सामान्य प्रशासन विभागाकडील अधिसुचना क्र एस आर व्ही २०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि. २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र १७/२०००, दि. ०१जुलै २००५ अन्वये विहीत केले नुसार लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नमुना अ भरणे आवश्यक आहे. उमेदवार अविवाहीत असल्यांस अर्जात याबाबत स्पष्ट उल्लेख करावा.

८. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यांस अथवा खोटी माहिती पुरविल्यांस अथवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या दबाव आणला अथवा गैर प्रकारचा अवलंब केल्यांस त्यांस निवड प्रक्रयेतुन बाद करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल व त्यांच्या विरुध्द् कायदेशीर कारवाई करण्यांत येईल.

९. चारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील.

१०. निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इ. यांची पुर्तता करुन देणे आवश्यक राहील तसेच त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहीत पध्दतीनुसार करुन घेणे बंधनकारक राहिल.

११. मुलाखतीस तसेच कागदपत्र पडताळणीस उमेदवारांस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१२. वरील अटी व शर्ती, नियमाव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

१३. सदर भरती प्रक्रियेसंदर्भात निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

१४. जाहिरातीमधील काही मुद्ये शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहिल.

१५. पात्र/अपात्र उमेदवारांची यादी कार्यालयातील सुचना फलकावर लावण्यात येईल त्या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

Sd/-
सदस्य, जिल्हा निवड समिती तथा
जिल्हा क्रिडा अधिकारी, सोलापूर

Sd/-
सदस्य सचिव जिल्हा निवड समिती तथा
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
सोलापूर

# शासकीय आश्रमशाळांमध्ये क्रिडा शिक्षक/ मार्गदर्शक - सन २०१८-१९
# अर्जाचा नमुना

| पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो |
|---|

| | |
|---|---|
| अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक<br>(कार्यालयीन कामकाजाकरिता) | |

---

## अर्जदाराने भरावयाची माहिती

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. अर्जदाराचे पुर्ण नांव | | | | | |
| | स्वत:चे नांव | वडीलांचे नांव | | आडनांव | |
| मराठीमध्ये | | | | | |
| इंग्रजीमध्ये | | | | | |
| २. धर्म | | जात | | | |
| ३. जातीचा प्रवर्ग- | | | | | |
| ४. लिंग- | | | | | |
| ५. अर्जदाराची जन्म तारिख | | | | | |
| ६. अर्जदाराचे (दि. ०१/०६/२०१८ रोजीचे) | | वर्ष | | महिने | |
| ७. अर्जदाराची वैवाहीक स्थिती | | विवाहीत | | अविवाहीत | |
| ८. अर्जदाराचा अधार क्रमांक | | | | | |
| ९. अर्जदाराचा पत्रव्यवहारासाठी पत्ता(पिनकोड सहित) | | | | | |
| १०. अर्जदाराचा भ्रमणध्वनी क्रमांक | | | | | |
| ११. अर्जदाराचा इ-मेल आय डी | | | | | |
| १२. .अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे काय ? | | होय | | नाही | |
| १३. .अर्जदार हा माजी सैनिक, स्वेच्छा सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/कर्मचारी आहे काय? | | होय | | नाही | |
| १४. अर्जदार हा किमान विद्यापीठ स्तरावर कोणत्याही खेळाचे प्रतिनिधीत्व केलेले आहे काय ?- | | होय | | नाही | |
| १५. असल्यास कोणत्या खेळाचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. | | | | | |
| १६. अर्जदारास क्रीडा मार्गदर्शक किंवा प्रशिक्षणाबाबत अनुभव आहे काय ? | | होय | | नाही | |
| १७. अनुभव असल्यास | | वर्ष | | महिने | |

११.अर्जदाराची शैक्षणिक पात्रता-

| अ.क्र | परिक्षेचे नांव | बोर्ड /विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एस. एस. सी | | | | | |
| २. | एच.एस.सी | | | | | |
| ३. | पदवी | | | | | |
| ४. | व्यवसाईक पात्रता (एन. आय. एस/बी.पी.एड/बी.एड (शारिरिक शिक्षण) | | | | | |
| ५. | उच्च शैक्षणिक पात्रता | | | | | |

वरील नमुद केलेला तपशिल माझे माहितीप्रमाणे पुर्णपणे सत्व आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता याची खात्री करुनच हा अर्ज मी करित आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो की, मी वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास माझी निवड रदद होणेस व त्या अनुषंगाने होणा-या इतर कार्यवाहीस बांधील राहिल याबाबत माझी कोणतीही तक्रार रहाणार नही.

दिनांक उमेदवाराचे पुर्ण नाव

ठिकाण उमेदवाराची स्वाक्षरी

---

अर्जा सोबत सादर करावयाचे कागदपत्रे ( कार्यालयीन उपयोगासाठी )

| अ.क्र | तपशिल | प्राप्त/अप्राप्त |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचा शाळा सोडल्याचा दाखल्याची साक्षांकित प्रत | |
| २. | अर्जदाराचा जातीचा दाखल्याची साक्षांकित प्रत (लागु असल्यास) | |
| ३. | अर्जदाराच्या शेक्षणिक पात्रतेच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रती | |
| ४. | अर्जदाराच्या बी.पी.एड/बी.एड(शारिरिक शिक्षण) परिक्षेच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत (लागु असल्यास) | |
| ५. | अर्जदार हा माजी सैनिक , स्वेच्छा सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/कर्मचारी असल्यास अनुषंगीक कागदपत्रे | |
| ६. | किमान विद्यापीठ स्तरावर कोणत्याही खेळाचे प्रतिनिधीत्व केलेले असल्याचा अनुषंगीक कागदपत्रे | |
| ७. | अर्जदाराकडे अतिरिक्त शैक्षणिक पात्रता असल्यास अनुषंगिक गुणपत्रकाची साक्षांकित केलेली प्रत | |
| ८. | अर्जदाराने विद्यपीठीय स्तरापेक्षा उच्च स्तरावर कोणत्याही खेळाचे प्रतिनिधीत्व केलेले असल्यास त्याचा अनुषंगीक कागदपत्रे | |
| ९. | विहीत नमुन्यातील लहान कुटुंबांचे प्रमाणपत्र | |
| १० | अर्जदाराच्या आधार कार्डची साक्षांकित केलेली छायांकित प्रत | |
| ११ | सक्षम अधिका-यांने निर्गमित केलेले रहिवास प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रत | |
| १२ | अनुभवाचे प्रमाणपत्र | |

प्रमाणित करण्यात येते की, अर्जातील आवश्यक असणारी अनुषंगीक कागदपत्र तपासणी केली असता पुर्ण/अपुर्ण आढळून आली करिता सदरचा अर्ज हा समितीने पात्र/अपात्र ठरविला आहे.